# नवी मुंबई महानगरपालिका
## महापालिका सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या **बुधवार, दिनांक ०७ जानेवारी २०१५ रोजी** भरलेल्या माहे जानेवारी महिन्याच्या सर्वसाधारण सभेतील **मंजूर/नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. १.**<br>**दि. ७ जानेवारी २०१५** | मध्य रेल्वे, मुंबईच्या "उपनगरीय रेल्वे उपभोक्ता सल्लागार समिती" (Suburban Railway Users Consultative Committee) वर नवी मुंबई महानगरपालिकेचा प्रतिनिधी नियुक्त करण्याबाबत, श्री. उदय बोभाटे, उप परिचालन प्रबंधक, छत्रपती शिवाजी टर्मिनल, मध्य रेल्वे यांचे दिनांक २५.११.२०१४ चे पत्र क्र. टी. ६४९/ए/१२/एस.आर.यु.सी.सी./आय एक्स. |
| **ठराव क्र. ९१९.**<br>**दि. ७ जानेवारी २०१५** | "मध्य रेल्वे, मुंबईच्या "उपनगरीय रेल्वे उपभोक्ता सल्लागार समिती" (Suburban Railway Users Consultative Committee) वर नवी मुंबई महानगरपालिकेचा प्रतिनिधी म्हणून श्री.साबु डॅनिअल यांची त्यांच्या सदस्य पदाच्या उर्वरित कालावधीकरिता नियुक्ती करण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. २.**<br>**दि. ७ जानेवारी २०१५** | इतिवृत्त कायम करणे. |
| **निर्णय -** | **महानगरपालिकेचे दिनांक १० डिसेंबर २०१४ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यात आले.** |
| **विषय क्र. ३.**<br>**दि. ७ जानेवारी २०१५** | प्रश्नोत्तरे. |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. ४.**<br>**दि. ७ जानेवारी २०१५** | कोपरखैरणे विभागातील महापे गाव येथे १.०० द.ल.लि. क्षमतेचा भूस्तरीय जलकुंभ व ०.५ द.ल.लि. क्षमतेचा उच्चस्तरीय जलकुंभ बांधणे तसेच तद्नुषंगिक कामे करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक २०/१२/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/अ.श.अ./१४९४/२०१४. |
| **ठराव क्र. ९२०.**<br>**दि. ७ जानेवारी २०१५** | "कोपरखैरणे विभागातील महापे गाव येथे १.०० द.ल.लि. क्षमतेचा भूस्तरीय जलकुंभ व ०.५ द.ल.लि. क्षमतेचा उच्चस्तरीय जलकुंभ बांधणे तसेच तद्नुषंगिक कामे करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. २ कोटी, ३३ लाख, १६ हजार, ९२९ मात्र इतक्या खर्चास, व नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **तां. का. क्र. ४८५.**<br>**दि. ७ जानेवारी २०१५** | नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०१५ करीता निवडणूकीकरीता आवश्यक असणा-या विविध साहित्यनिहाय होणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक ०६/०१/२०१५ चे पत्र क्र.नमुंमपा/निवडणूक/०४/२०१५. |
| **ठराव क्र. ९३०.**<br>**दि. ७ जानेवारी २०१५** | "नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०१५ निवडणूकरिता आवश्यक असणा-या विविध साहित्यनिहाय प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह प्रती मतदारास रु. ६५/- या प्रमाणे संभाव्य खर्च विचारात घेऊन त्यानुसार ८ लक्ष मतदारासाठी (८,००,००० x ६५= ५,२०,००,०००/-) एकुण ५,२०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असुन इतर खर्च रु. १९ लक्ष समाविष्ठ करुन एकुण रु. ५३९ लक्ष इतक्या निवडणूक खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी " |
| **निर्णय -** | **स्थगित.** |

**महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी मा. आयुक्तांकडे पाठविलेल्या सन्मा. नगरसेवकांच्या ठरावांची यादी**

**माहे जानेवारी २०१५ ची सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | **श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील शेतक-यांच्या जमिनी एम.आय.डी.सी. क्षेत्राकरीता शासनाने अधिग्रहित केल्या. त्यामुळे येथील शेतकरी प्रकल्पग्रस्त म्हणुन ओळखला जाऊ लागला. ज्यांच्या जमिनी एम.आय.डी.सी. साठी अधिग्रहीत केल्या आहेत त्या प्रकल्पग्रस्तांना एम.आय.डी.सी. कडून वितरीत करण्यात आलेल्या भुखंडावरील मालमत्तेसाठी नवी मुंबई महानगरपालिकेकडून इतर उद्योजकांकडून आकारण्यात येणा-या वाणिज्य दराने मालमत्ता कर आकारला जात आहे. त्यामुळे या प्रकल्पग्रस्त शेतक-यांवर एक प्रकारचा अन्याय होत आहे. याकरीता प्रकल्पग्रस्तांना एम.आय.डी.सी. ने पी.ए.पी.(PAP) तत्वावर वाटप केलेल्या भूखंडांना विशेष सवलत म्हणुन रहिवाशी मालमत्ता कर दराने मालमत्ता कर आकारणे. | ५<br>जानेवारी | ९२१<br>०७/०१/२०१५ | मंजूर |
| २. | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-** महापालिकेवर एखादी जनहित याचिका किंवा खटला (Case) झाल्यास जर बाधित पार्टी स्वःखर्चाने तज्ञ सल्लागार किंवा वकील देत असेल तो महानगरपालिकेने घेतला पाहिजे, जेणेकरुन कर भरणा-या जनतेचे पैसे वाचतील व महानगरपालिकेला मोफत तज्ञ सल्लागार मिळेल. | ६<br>जानेवारी | ९२२<br>०७/०१/२०१५ | मंजूर |
| ३. | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिकेने देखील सिडको व एम.आय.डी.सी. च्या धर्तीवर मा. उच्च न्यायालयाकडून खटला (Case) किंवा जनहित याचिकेवर आलेल्या आदेशाबाबत मत घेण्यासाठी तज्ञ सल्लागार, निवृत्त न्यायाधिश किंवा वकीलांची नेमणूक करावी, जेणेकरुन कायदेशिर अडचणी येणार नाहीत. | ७<br>जानेवारी | ९२३<br>०७/०१/२०१५ | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ४. | **सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-** सानपाडा से. ४ येथील श्री. दत्तगुरु, कस्तुरी, सप्तपर्णी आणि अश्वथा सोसायटी मधील राहणारे सदनिकाधारक हे अल्प उत्पन्न घटकातील रहिवाशी आहेत. सिडको निर्मित चाळीतील बहुतांशी सदनिकाधारकांनी गरजेपोटी सिडको प्रशासन तसेच नवी मुंबई महानगरपालिकेची कागदोपत्री बांधकाम परवानगी घेऊन आपले हक्काचे घर बांधले आहे परंतु अद्यापही बरेचसे रहिवाशी बांधकाम करु शकले नाहीत त्यामुळे सोसायटीच्या पाणी वेळापत्रकानुसार सर्वच सदनिकाधारकांना पुरेसे पाणी मिळत नाही अशी बांधकाम केलेल्या सदनिकाधारक बरीच वर्षे प्रशासन दरबारी तक्रारी करत आहेत. तरी नवी मुंबई महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेऊन वरील चारही सोसायटीतील सदनिकाधारकांना घरटी स्वतंत्र मिटर बसवुन पिण्याच्या पाण्याचे नियोजन करावे. | ८<br>जानेवारी | ०७/०१/२०१५ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| ५. | **सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-** सानपाडा गावठाण विस्तार योजनेतील सदनिकाधारक नवी मुंबई महानगरपालिकेचे नियमित भरणा करणारे करदाते आहेत. परंतु त्यांच्या सोसायटीत प्रशासनाचा कोणताच निधी वापरता येत नसल्यामुळे ते सतत खेद व्यक्त करीत असतात. ज्याप्रमाणे सिडको निर्मित सोसायटीत नगरसेवक निधी व प्रभाग निधीअंतर्गत कामकाज करण्यात येते त्याच धर्तीवर नवी मुंबईतील सर्वच गावठाण विस्तार योजनेतील भुखंडावरील सोसायटीत कामकाज करण्यासाठी नगरसेवकांना निधी वापरण्याची परवानगी देणे. | ९<br>जानेवारी | ०७/०१/२०१५ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| ६. | **सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-** नवी मुंबईतील सर्वच गाव गावठाणात प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधकाम केलेले आहे. ही सर्व बांधकामे नियमित करणेसंदर्भात शासन निर्णयही झाला आहे. परंतु त्याचे कायद्यात रुपांतर न झाल्यामुळे आजही ही सर्व बांधकामे अधांतरी आहेत. आपल्या तुटपुंज्या उपजिविकेतुन जो हे घर घेतो त्यास हयाची कल्पनाही नसते. माझी प्रशासनास विनंती आहे कि हया सर्व सदनिकाधारकांना तिप्पट जी करआकारणी केली जाते ती रद्द करुन त्यांच्याकडुनही गाव गावठाण सिडको भुखंडावरील करदात्याप्रमाणे नियमित करआकारणी आकारण्यात यावी. तसेच जलजोडणीशुल्क व इतर कायदेशीर सर्व शुल्क स्विकारुन त्यानांही सेवा पुरविणे. | १०<br>जानेवारी | ०७/०१/२०१५ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ७. | **श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिष्ट, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात वाहनावर बसविलेले उच्च क्षमतेचे सक्शन व जेटिंग युनिट (रिसायकलर) वाहन लवकरात लवकर कार्यरत करावे. | ११ / जानेवारी | ९२४ / ०७/०१/२०१५ | मंजूर |
| ८. | **श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिष्ट, यांजकडून :-** मुकुंद कंपनी ते महापे जंक्शन पर्यंतचा एम.आय.डी.सी. मार्ग काँक्रीटीकरण करण्याचे काम व सोबत रस्ता रुंदी करण्यात या मार्गावर येणारे क्षेत्रातील बाधित झोपडीधारक क्षेत्र, पाटीलवाडी (विष्णुनगर) सुभाषनगर (इलठण) चिंचपाडा, गवतेवाडी (गणेशनगर) झोपडयांचे ठाणे बेलापूर रोडवर बाधित झोपडया किंवा घरांच्या (दिघा विभागातील) पुर्नवसन ज्या धोरणानुसार करण्यात आले त्याच धोरणानुसार प्रथम वरिल क्षेत्रातील झोपडयाचे पुर्नवसन करण्यात यावे त्यानंतर बाधीत क्षेत्रातील रस्त्यांचे रुंदीकरण व काँक्रीटीकरणाचे काम करणे. | १२ / जानेवारी | ९२५ / ०७/०१/२०१५ | मंजूर |
| ९. | **श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिष्ट, यांजकडून :-** प्र. क्र. ५, इलठणपाडा मधील श्रीरामचाळ, कन्हैयानगर, आदिवासीपाडा स्मशानुभूमी या ठिकाणी पाणी पुरवठा व्यवस्थित होत नसुन पाणी समस्या गंभीर स्वरुपाचे आहे. वरिल ठिकाणी पाणी पुरवठा सुरळित होणेकरिता या चारी ठिकाणी २०,००० लि. क्षमतेची सिन्टेक्स किंवा योग्य पाणी टाकीची व्यवस्था करणे. | १३ / जानेवारी | ९२६ / ०७/०१/२०१५ | मंजूर |
| १०. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** आग्रोळी गांव उड्डाणपुलाखालील समाजमंदीरामध्ये व्यासपीठाच्या दोन्ही बाजुला लहान आकाराच्या (१० फुट x १० फुट) पक्या स्वरुपातील दोन खोल्या उभारणे. | १४ / जानेवारी | ९२७ / ०७/०१/२०१५ | मंजूर |
| ११. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** आग्रोळी गाव व सेक्टर २९ आग्रोळी गांव येथील वसाहतीसाठी दिशा दर्शक फलक माहिती दर्शक फलक उभारणे. | १५ / जानेवारी | ९२८ / ०७/०१/२०१५ | मंजूर |
| १२. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** सी.बी.डी. सेक्टर १ मार्केटमधील जुने नगररचना व उद्यान विभाग कार्यालयाची जागा सद्यस्थितीत रिकामी आहे. सदर जागी अनुक्रमे महिला रहिवाशांच्या साठी स्त्री सक्षमीकरण केंद्र आणि स्थानिक रहिवाशांच्यासाठी अल्पदरात वृत्तपत्र वाचनालय, ग्रंथालय कार्यान्वीत करणे. | १६ / जानेवारी | ९२९ / ०७/०१/२०१५ | मंजूर |